**<u>एम. ए. सी. पी. क्र.८२/२०२२</u>**
**निशाणी नं.३५**

## अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०२ ची साक्ष
## मी, सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नाव** | :- | **डॉ.नरेंद्र दिलीप पंडीत,** |
| **वय** | :- | ४९ वर्षे |
| **व्यवसाय** | :- | वैद्यकीय अधिकारी |
| **राहणार** | :- | कोर्ट गल्ली, ता.जि.अहमदनगर. |

..........................................................................................

**<u>सरतपास अर्जदारातर्फे आर. बी. कळमकर वकिल साहेब</u> -**

माझे शिक्षण बी एच एम एस, पी जी डी एम एस असे झाले असुन मी साई एशियन हॉस्पीटल, अहमदनगर येथे गेल्या ७ वर्षापासुन कार्यरत आहे. उत्कर्ष संजय गोत्राळ हे अपघातामध्ये जखमी होवुन उपचारासाठी आमच्या हॉस्पीटलमध्ये भरती झाले होते. ते दि.२३.०१.२०२१ ते दि.०१.०२.२०२१ पर्यंत भरती होते. उपचारादरम्यान त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. उपचारावर झालेल्या खर्चाचे बील मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. हॉस्पीटलचे बीलींग सेक्शन व ओपीडीचे बीलींग सेक्शन वेगवेगळे असुन अनु.क्र.४३ व ४४ वरील बील आमच्या हॉस्पीटलचे ओपीडीचे आहे. अनु.क्र.४५ ते ४८ वरील बील आमच्या हॉस्पीटलचे आहे. वरील सर्व बीलावर संबंधीत लेखापालची सही आणि हॉस्पीटलचा शिक्का आहे. सदरचे बील आमच्या हॉस्पीटलमधुन देण्यात आले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. वरील सर्व बीलांना एकत्रीतरित्या **<u>निशाणी क्रमांक ३६</u>** देण्यात आली.

**उलटतपास सामनेवाला क्र.१ व २ तर्फे बोठे वकील साहेब पुकारा केला असता गैरहजर.**

**<u>उलटतपास सामनेवाला क्र.३ तर्फे एस. आर. जाधव वकिल साहेब</u> -**

२. आमच्या हॉस्पीटलला महाराष्ट्र शासनाने किंवा क्रेंद शासनाने उपचाराच्या खर्चाच्या संबंधाने लागु केलेली योजना कार्यान्वीत नाही. ज्यावेळी जखमी आमच्या

हॉस्पीटलमध्ये भरती होते त्या काळात हॉस्पीटलमध्ये आर्थोपेडीक सर्जन म्हणुन डॉ.जगदीश चहाळ पाटील होते. जखमीच्या बाबतीत आम्ही न्युरो सर्जन अमोल कासवा यांचे मत घेतले. हे बरोबर की, जखमीवर झालेली शस्त्रक्रिया आणि उपचारांशी प्रत्यक्ष माझा संबंध आलेला नाही. हे बरोबर की, संपुर्ण जखमा ब-या झाल्यानंतर जखमीला हॉस्पीटलमधुन डिस्चार्ज देण्यात आले. ओपीडीच्या अनुषंगाने आमच्याकडे केसपेपर नाही. हॉस्पीटलचे बीलावर पेड म्हणुन शेरा असुन ओपीडीच्या बीलावर पेड किंवा प्राप्त असा शेरा नाही. हे बरोबर की, बीलींग सेक्शनशी माझा संबंध येत नाही. रेकॉर्डवर दाखल बीलांवर पिंपळे यांची सही आहे. हे बरोबर की, सदर पेशंटच्या अनुषंगाने आमच्या हॉस्पीटलकडुन कुठल्याही प्रकारचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले नाही. हे बरोबर नाही की, चुकीचे ओपीडीचे बील दिले आहे. हे बरोबर नाही की, पेशंटला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत.

**(महेश सि. तिवारी)**
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर.

समक्ष

**(महेश सि. तिवारी)**
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर.

दिनांक : १६.०१.२०२५